IJARSCT
ISSN (Online) 2581-9429
International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Impact Factor: 7.301
Volume 3, Issue 3, January 2023

# एड्स समज, गैरसमज व वास्तवता

**सौ सीता दत्तात्रय जाधव**
ग्रामीण रुग्णालय, पोलादपूर
आय. सी. टी. सी. विभाग, रेड रिब्बन क्लब अंतर्गत,
सुंदरराव मोरे महाविद्यालय, पोलादपूर, रायगड, महाराष्ट्र

**गोषवारा**

" In any disease prevention is better than cure "या म्हणी नुसार कोणताही आजार होण्याआधी तो न होण्यासाठी काळजी घेतली तर बरे असते. त्या साठी एड्स हा महाभयंकर कलंकित व इतराकडून दुर्लक्षित केला जाणारा आजार आहे. त्यामुळे त्या बद्दल अजूनही म्हणावी तशी जागरूकता झाली नाही.लोकांचा मनात या बद्दल चे गैरसमज आहेत, त्यामुळे एड्स बद्दल सजग माहिती होणे ही काळाची गरज आहे त्यासाठीचा केलेला प्रयत्न, हा सोपा साध्या सरळ भाषेत एड्स आणि एच आय व्ही म्हणजे काय त्याची व्याख्या काय तो कशा मुळे होतो त्याची करणे व उपाय त्याची निदान कोणत्या पद्धतीने केले जाते आणि त्यावरील औषध उपचार याची थोडक्यात माहिती.

कूटशब्द - एड्स , एचआयव्ही विषाणू ,निदान, तपासणी, औषध एआरटी कंडोम गरोदर माता STI/. TB.

**प्रस्तावना**

एड्स लॉग फॉर्म Acquired (प्राप्त) immune ( प्रतिकार शक्ती) Deficiency (आभाव ) syndrom (लक्षण समूह) एड्स ची मराठीत व्याख्या प्रतिकार शक्तीचा आभावाने प्राप्त झालेला अनेक रोगांचा समूह म्हणजे एड्स.एड्स हा विषाणू मुळे होतो Human immunodeficiency virus ( मानवी प्रतिकार शक्ती कमी करणार विषाणू ) एड्स च्या विषाणू चा शोध 1983 साली डॉ ल्यूक मॉन्टीग्रयर (फ्रेंच ) डॉ रॉबर्ट गॅलो (अमेरिका ) या शास्त्राज्ञानी लावला.जगामध्ये 1981 पहिला एड्स रुग्ण आढळला.भारतात 1986 साली मद्रास मध्ये पहिला एड्स रुग्ण आढळला.भारतात मे 1986 मध्ये पहिला एड्स रुग्ण मुंबई शहरात आढळला.भारतात सर्वात ज्यास्त रुग्ण महाराष्ट्र /आंध्रप्रदेश /तामिळनाडू /कर्नाटक राज्यात आहेत. महाराष्ट्र राज्यात सर्वात ज्यास्त HIV रुग्ण

सांगली जिल्हात आहेत. महाराष्ट्र शहरांपैकी HIV रुग्ण मुंबई शहरात आहेत. भारतात एड्स रुग्णासाठी "NACO/ National Aids control organization" Delhi.ही संस्था काम करते महाराष्ट्र राज्यात MASAC "-maharashtra state Aids Control society" ही संस्था एड्स रुग्ण यांचा साठी काम करते .

जिल्हा पातळीवर " District aids control and programm unit, " हे काम करते.त्याचा अंतर्गत तालुका लेवल "ICTC centre " काम करतात.जागतिक एड्स day 01डिसेंबर ला असतो.त्या दिवशी जनजागृती चा दृष्टीने अति जोखमीची ठिकाणे अतिजोखमीची लोकसंख्या यांचा साठी यंग पॉपुलशन साठी लेक्चर/तपासणी /पथनाट्य व इतर उपक्रम त्यात फेस पैंटिंग/ वॉल पेन्टिंग/एड्स वर रील बनवणेया स्पर्धा ठेवले जातात..RED RIBBON CLUB (RRC) स्थापना केली जाते यंग पॉपुलशन / स्थलांतरित लोक ट्रकर्स यांचा साठी कंडोम काउन्सलिंग केले जाते.

a) त्यात कंडोम बद्दल माहिती दिली जाते त्यात

b) कंडोम कसा वापरणे वापरल्या नंतर तो कसा फेकणे.c) कंडोम वापरामुळे एच आय. व्ही व गुप्तरोग होत नाहीत d)अनचाही गर्भाधारण होत नाही.

एड्स रोगाच्या प्रसाराची कारणे

- असुरक्षित लेंगिक संबंध (स्त्री -पुरुष /पुरुष -पुरुष ).
- HIV बाधित व्यक्तीचे रक्त व रक्त घटक निरोगी वक्तीस दिल्यास (रक्त संक्रमण ).
- HIV बाधीथ वापरलेल्या सुया/सिरिंज निरजंतूक न करता वापरल्यास.
- HIV बाधित गरोदर मातेपासून तिचा होणाऱ्या बाळाला नाळेमार्फत.
- भारताचा बाबतीत स्त्री पुरुष किंवा समलिंगी असुरक्षित संबंध हे प्रसारचे प्रमुख कारण असल्याचे दिसून येते

एचआयव्ही कशामुळे होत नाही

- HIV बाधित व्यक्तीसी हस्तआंदोलन केल्याने
- चुंबन घेतल्याने,
- एकत्र बसल्याने,
- एकत्र जेवल्याने,
- एकत्र राहिल्याने.
- मच्छर चावल्याने
- एक शौचालय वापरल्या ने हिवहोत नाही

एड्स या रोगाचा प्रसार होत नाही.

एड्स होण्याचा कारणाचा विचार करून प्रत्येक नागरिकांनी स्वतः दक्षता घेणे आज काळाची गरज व जबाबदारी आहे.

<u>एड्स बद्दलची लक्षणे</u>

अकारण वाजनात 10%पेक्षा घट होते.

- सतत बारीक ताप रात्रीचा घाम (01महिन्याचा जास्त कालावधी ).
- सतत जुलाब होणे कोणतेही औषध घेतले तरी बरे न होणे.
- तोंडात व अन्न नलिका बुरशी जन्न चट्टे उठणे.
- 03महिण्यापेक्षा ज्यास्त काळ राहणारी लसिकाग्रंथी (lymph node) ला सूज.
- इतर लक्षणे न्यूमोनिया / मेंदूज्वर /हरपीस नागीण / विविध प्रकारचे कर्करोग / क्ष्यरोग.

एचआयव्ही तपासणी कधी करावी

1. एकापेक्षा जास्त व्यक्ती सोबत असुरक्षित शारीरिक संबंध आल्यास
2. गुप्त रोग झाल्यास
3. TB झाल्यास
4. दूषित सुई व सिरिंज चा वापर केलास
5. रक्त व रक्ताघटकाचे संक्रमण झाले असल्यास
6. महिला गरोदर असल्यास.

एड्स बद्दलच्या विविध चाचण्या

एखाद्या वक्तीला HIV आहे काय हे जाणून घेण्यासाठी तपासणी हा एकमेव मार्ग आहे.

1. एलायझा चाचणी संसार्गाचे प्राथमिक निदान.
2. गवाक्ष काळत( विन्डो पिरियड) 03-05महिने या काळात HIV टेस्ट नेगेटिव्ह येऊ शकते म्हणून ती तीन महिन्यांनी परत करावी.
3. वेस्टर्न ब्लॉट हमखास 100% खात्रीशीर चाचणी एलयझा चाचणी पॉसिटीव्ह आल्यावर Hiv संसर्गाची खात्री या चाचणी ने करतात.
4. PCR test ही जगात प्रगत चाचणी म्हणून डी एन ए ची तपासणी करतात. विषाणू ची लागण झाल्यास तिसऱ्या दिवशी ही test पॉसिटीव्ह येते.
5. March 1985या सालापासून HIV टेस्टिंग ची सुरवात झाली.

6. Naco guildline चा HIV टेस्टिंग हे स्टाटरर्जी III नुसार HIV टेस्टिंग साठी तीन प्रकारचा प्रिंसिपल वेगवेगळी असणारे किट वापरले जातात जेव्हा पहिले टेस्ट पॉझिटिव्ह येते त्यानंतर दुसरी व तिसरी किट ने टेस्टिंग केले जाते त्यावेळीस तिन्ही किट चे रिपोर्ट पॉझिटिव्ह येतील तेव्हा त्या patient पॉझिटिव्ह रिपोर्ट दिला जातो
7. HIV टेस्टिंग मध्ये तीन भाग येतात प्रीआन्यालिटिकल/ आन्यालिटिकल /पोस्ट आन्यालिटिकल. यामध्ये प्रथम समुपदेशक क्लायंट चे नाव गाव फोन नंबर लँड लोकेशन किंवा लँड मार्क शिक्षण व्यवसाय इत्यादी माहिती घेऊन त्यांना HIV टेस्ट साठी संमतीपत्र घेऊन PID NO देउन टेस्टिंग साठी ICTC LAB ला पाठवतात जिथे सर्व काम हे QMS check list (quality manegment system ) चा नियमानुसार सर्व काम केलली जातात
8. त्यात क्लायंट entry पासून रिपोर्ट डिस्पॅचं होई पर्यन्त सर्व नियमावली अवलंबली जाते त्यामध्ये किट म्यॅनजमेंट,कोल्ड चैन मैण्टिन प्रॉपरली, ब्लड कॉलेकशन टेस्टिंग रिपोर्टींग रजिस्टर मेण्टिन first aid बॉक्स, स्पीलेज बॉक्स daily tempature reg. या सर्व गोष्टी रोजचारोज मैण्टिन करून ICTC LAB या ठिकाणी प्रयोगशाळा तंत्रज्ञ क्लायंट ची माहितीची खात्री करून PID NO क्लायंट यांची खात्री करून त्याचे ब्लड collection करतात त्यावेळीस त्या क्लायंट चे नाव / PID NO या दोनी गोष्टी ब्लड कॅलेकशन ट्यूब वर id मार्क म्हणून टाकतात. त्यानंतर ब्लड set झाल्यावर ब्लड सिरम यांचा वापर करून HIV टेस्ट केली जाते सध्या फर्स्ट टेस्ट म्हणून combaid टेस्ट चा वापर करतात या सर्व टेस्टिंग हे sop (standard operating procedure ) केले जातात . टेस्टिंग तद नंतर नेगेटिव्ह /पॉझिटिव्ह /इंडेटर्मिनट असें result इंटरप्रेटेशन असते त्यात प्रथम नगेटिव्ह असल्यास नेगेटिव्ह रिपोर्ट बनवून समुपदेशक यांच्याकडे डिसपॅच केला जातो. जर प्रथम टेस्ट पॉझिटिव्ह आली तर पुन्हा सेकंड / थर्ड टेस्ट करतात वेगवेगळ्या पद्धतीच्या टेस्ट किट असतात जर तिन्ही टेस्ट पॉझिटिव्ह आल्यास सदर रिपोर्ट पॉझिटिव्ह दिला जातो तो समुपदेशक डिसपॅच केला जातो. जर inderminate म्हणजे पहिली टेस्ट पॉझिटिव्ह (दुसरी पॉसिटीव्ह तिसरी टेस्ट नेगेटिव्ह किंवा दुसरी नेगेटिव्ह तिसरी पॉझिटिव्ह ) आल्यास तो रिपोर्ट inderminate असतो असें सॅम्पल हे रिटेस्ट साठी SRL लॅब(state reference Lab) ला कन्फर्म साठी पाठवता. त्याच्याकडे पण same result आला tar srl report तो ictc ictc to रिपोर्ट क्लायंट ला deto तोही SRL report वेगळा आला tar ते सॅम्पल NARI(नॅशनल एड्स रिसेर्च इन्स्टिट्यूट )ला western blot sathi पाठवतात NARI चा

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)
Volume 3, Issue 3, January 2023

report क्लायंट ला दिला जातो. असा प्रकारे टेस्ट रिपोर्ट नुसार क्लायंट HIV -1/HIV -2/ HIV 1&2 रिपोर्ट असतो असें फायनल रिपोर्ट समुपदेशक यांचा कडे त्यात्या दिवशी दिला जातो त्यानुसार समुपदेशन केले जाते नेगेटिव्ह रिपोर्ट वाले यांना सर्व माहिती सांगून काही शंका या आजाराची लक्षणे आढळ्यास पुनःहा तीन महिन्यांनी रिपीट टेस्ट सांगतात.

9. गरोदर महिला यांना कमीत कमी पाच वेळा हॉस्पिटल ला जाऊन जनरल तपासणी करावी तसे वेळापत्रक असते

    1) पाळी चुकल्यावर तीन महिन्याचा आत

    2) गर्भावस्थेचे पाच महिने पूर्ण झाल्यानंतर

    3)गर्भवस्थेचा सातव्या महिन्यात

    4) गर्भवस्थेचा आठव्या महिन्यात

    5) गर्भवस्थेचा नवव्या महिन्यात

10. प्रस्तुती पूर्व तपासनी या मध्ये गर्भात वाढण्याऱ्या बाळाचे 10-12 kg वजन होऊन मातेचे ब्लड प्रेशेर रक्ताचे प्रमाण योग्य असले पाहिजे त्याच बरोबर गरोदर मातेला दो न धनुर्वात याची इंजेकशन एक महिन्याचा अंतराणे दिली गेली पाहिजेत गरोदरपणात नियमित देण्यात येणारी पोषकद्रव्य उदा. आयर्न (लोह ) फॉलीक ऍसिड. कॅलसियम चा गोळया याबद्दल माहिती देऊन या चोथ्या महिन्यापासून प्रस्तुती नंतर सहा महिन्यापर्यंत चालू ठेवावीत गरोदरपणात चांगला पोषक आहारावर भर तसेच योग्य विश्रानंतीचे महत्व असते.

गरोदरपणात धूम्रपान तंबाखू आणि दारू पासून दूर रहा याचे बाळावर परिणाम होतो काही तपसण्या बाबत डॉ सल्ला घ्या Xray काढू नये.लिंग परीक्षण करू नये कायद्याने गुन्हा आहे.

अति जोखामीची गरोदर माता म्हणजे पायावर सूज / योनीतून रक्त श्राव / पोटात सतत दुखत राहणे / खूप जोरात डोकं दुखणे किंवा चक्कर येणे / गर्भाची हालचाल अचानक बंद होणे किंवा मुरच्छा यापैके कोणतीही परिस्तिथी असल्यास डॉ सल्ला घेणे व HIV तपसणी माहिती घेणे गरजेचे असून होणार बाल HIV पासून मुक्त झाले पाहिजे याचे समुपदेशन केले जाते HIV

1) रिपोर्ट नेगेटिव्ह आल्यास त्या गरोदरमातेचे स्वागत करा कि तुमचा रिपोर्ट चांगला आहे तो देताना नाव ृपी आ य डि नंबर पुन्हा तपासून घ्या व स्पष्ट सरळ चर्चा करा.गरोदर मातेला स्तन पणाचे महत्व सांगा

HIV होऊ नये या बाबत चर्चा करा.


DOI: 10.48175/IJARSCT-8144

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Volume 3, Issue 3, January 2023

2) HIV रिपोर्ट पॉझिटिव्ह आल्यास तुम्हाला माहिती आहे काय HIV मुळासकट दूर करणे शक्य नाही संभव नाही पण असे अनेक मार्ग आहेत कि ज्याचा अवलंब करून HIV पॉसिटीव्ह वक्ती अनेक वर्षापर्यंत स्वस्था जीवन जगू शकते. तुम्ही ART औषधबद्दल ऐकले आहे काय समरच्याकडून उतरा ची वाट पहा

अन सांगा ART औषध HIV पूर्ण पणे बरा करत नाही. त्या क्लायंट ला जवळ ची ART केंद्र याची माहीती त्याची टाइम्स व तिथेल संबंधित वक्तीची माहिती पत्ता दिले जाते त्या संदर्भात सेवेचा फोन नंबर .

H) या सर्व आस्थापनेत गरोदर माता महत्वाची असते कारण गरोदर मातेची पहिल्या तीन महिन्यात HIV तपासणी महत्वाची असते कारण तिचा पासून बाळा ला आजार होतो यदाकदाचीत गरोदर माता पॉसिटीव्ह आले तर तिला लवकरत लवकर ART औषध चालू केली जातात जेणे करून तिचा viral load विषाणूची संख्या कमी ठेवण्यासाठी.

- एड्स तपासणी साठी NGO / मोबाईल व्याहान / PPP public private practioner सेन्टरblood bank पण HIV testing साठी मदतपूर्ण काम करतात. कि कोणताही patient testing treatment शिवाय चुकू नाहीत.
- एड्स वर प्रतिबंधात्मक लस नाही.एड्स बाबतीत प्रतिबंध हाच उपाय.
- त्यासाठी जास्तीत ज्यास्त लोकांपर्यन्त जनजागृती होणे गरजेचे आहे एड्स योग्य माहिती उपाय तपासणी यांची जनजागृती करणे काळाची गरज आहे.
- न्याको अंतर्गत महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटी अंतर्गत dapcu अंतर्गत ICTC काम करतात त्या त्या तालुक्यातील ICTC समुपदेशक /प्रयोगशाळा तंत्रज्ञ हे गावोगावी ग्रामपंचाईत /शाळा कॉलेज /सरकारी ऑफिस सर्व /हाय रिस्क ठिकाणे बसस्टेशन रेल्वे स्टेशन हॉटेल डान्स बार या ठिकाणी जनजागृती व तपासणीचे कॅम्प करतात युवा दिन एड्स डे RRC अंतर्गत ला पथ नाट्य रैल्ली काढून जनजागृती करतात .
- या विविध स्तरावरून जनजागृती करून तपासणी केली जाते त्यावेळीस प्रथम संमतीपत्र घेउन सर्व माहिती देऊन त्यांचे रक्तनमुने घेतले जातातत्या रक्तानुमण्याची तपासणी हि naco guildline चा प्रोटोकॉल नॉर्म नुसार केली जाते त्या तपासणी अंती पॉसोटीव्ह येणाऱ्या लोकांना सखोल माहिती देऊन त्यांची भीती दूर करून त्यांना सर्व म्हणजे गुप्तरोग टी बी या बद्दल काउन्सल्लिंग केली जाते. कारण HIV असणाऱ्या व्यक्तीला TB असू किंवा होऊ शकते किंवा TB असणाऱ्या व्यक्तीला HIV असू किंवा होऊ शकतो म्हणूनच HIV

असणाऱ्या व्यक्तीची TB टेस्ट compalsary करतात आणि TB असणाऱ्या व्यक्तीची HIV टेस्ट compalsary करतात व त्यांचे सेक्सऊल स्टेटस विचारात घेउन त्यांच्या पार्टनर ची सखोल चौकसी करून त्यांचे हि तपासणी केली जाते हि सर्व माहिती गोपनीय असते हे समजवून झाल्यावर त्यांना ART औषध प्रणाली साठी पाठवतात त्याच वेळीस सर्व माहिती गोपनीय असून त्याचा इतर तपासण्या केल्या जातात.त्यात STI /VDRL TEST / RFT / LFT/ CBC /Sputum TB या सर्व चाचण्या करून ART पाठवतात, कि तिथे HIV बाधित वक्तीचा CD4 COUNT / VIRAL LOAD तपासून ART औषध प्रणाली सुरु केली जाते त्यात TLE/ZLN /TLD हे viral ड्रग दिले जातात. July 1987 झुडिव्हिडीन हे औषध

- एड्स उपचारासाठी उपलब्ध झाले.
- एड्स वरील औषध झुडिव्हिडीन / नेव्हरापिन ही सर्व विषाणूची वाढ थोपवतात त्यामुळे रुग्णाचे आयुष्य वाढते.
- एचआयव्ही पॉझिटिव्ह व्यक्ती चा सहवासातील वक्ती ची पण एचआयव्ही टेस्ट कंपलसरी करून घ्यावी लागते मग ती बायको मुले सेक्सऊल जोडीदार स्त्री किंवा पुरुष कोण असेल त्यांची ही HIV टेस्ट केली जाते. जेणे करून पॉझिटिव्हिटी शोधण्यासाठी आवश्यक असते.
- HIV सह जगणाऱ्या वक्तितीस इतर सोसिएल बेनेफिट असाध्य रोग अंतर्गत म्हणून पेन्शन / st pass / शिधा पत्रिका पिवळी करून दिली जाते.
- अशा लोकांना समाजात सामानतेची वागणूक देऊन भेदाभेद दूर केला पाहिजे त्यासाठी.HIV सह वक्ती खूप काळ live राहिले पाहिजे त्यासाठी चे सर्व प्रयत्न केले जातात.
- महाराष्ट्र राज्य शासन यांनी लॉ ऑफ ऍक्ट तयार केला असून एच आय व्ही व एड्स (प्रतिबंध व नियंत्रण )अधिनियम 2017(2017 चा 16) यांचा कलम 23 24,25, v34 तसेच कलम 49 अंतर्गत अधिकाराचा वापर करून एच आय व्ही व एड्स लोकपाल व कायदेशीर कारवाई होऊ शकते..
- HIV साठी 1097हा टोल फ्री नंबर अधिक माहितीसाठी आहे..
- NACO मार्ग दर्शक सूचनेनुसार (90/90/90) म्हणजे 90% लोकांपर्यंत पोहोचून नोन टु युअर HIV टेस्टिंग स्टेटस करने त्यातील पॉझिटिव्ह 90% ऑन ART करने त्यातील 90% लाईव्ह लॉग विथ ART असे काम करने

IJARSCT

ISSN (Online) 2581-9429

IJARSCT

Impact Factor: 7.301

International Journal of Advanced Research in Science, Communication and Technology (IJARSCT)

Volume 3, Issue 3, January 2023

**समारोप**

- सगळ्यात शेवटी वास्तविक स्वरूपात prevention is better than cure. या म्हणी नुसार रोग होऊ नये म्हणून काळजी घ्यावी त्यासाठी कंडोम कौसेल्लिंग महत्वाचा भाग असून ती माहिती लोकांपर्यत तरुणांपर्यन्त पोहचवून त्यांना लग्नाअगोदर ब्रह्मचर्य व लग्नानंतर श्रीराम सारखे एकपत्नी राहिले पाहिजे.
- HIV रुग्णाची संख्या कमी होऊन झीरो गाठता येईल याच करिता सर्व गरोदर मताची एड्स तपासणी ही शासन मान्य केंद्रातच झाली पाहिजे.
- एड्स व्यक्तीसी प्रेमाने सालोखाने वागण्याने त्याची आयुष्मान वाढू शकते प्रेम वाढू शकते पण एड्स वाढू शकत नाही.

**संदर्भ**

[1].National Guideline for HIV -- 2015

[2].National HIV Counseling and Testing services.(H.C.T.S.) Guideline

[3].DES 2016